# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-४६ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १२ जून २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669




# भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेचे राज्यात जुळलं, दिव्यात का जुळत नाही?



**मागील वर्षी जून मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेचे सरकार राज्यात आलं. राज्यात शिंदे आणि भाजपचं जुळलं... पण मागील वर्षभरापासून दिव्यात मात्र शिंदेंच्या शिवसेनेचे आणि भाजपचं का बिनसलं त्याचा विचार दोन्ही पक्षातील जिल्हा नेतृत्वाने अद्याप केलेला नाही असं म्हणता येणार नाही.**

**रोखठोक/सुहास खंडागळे**

दिव्यात शिवसेनेचे आठ नगरसेवक २०१७ ला निवडून आले. त्याचवेळी स्वतंत्र लढलेल्या भारतीय जनता पार्टीने शिवसेनेला जोरदार टक्कर दिली. काही मतांच्या फरकाने भाजपचे चार उमेदवार पडले. परिणामी दिव्यातील जनतेने विरोधी पक्षाचा कल हा भाजपच्या बाजूने दिला. राज्यात सत्ता येईपर्यंत दिवा भाजपने विरोधी पक्षाची भूमिका चोख बजावली...आजही येथील पदाधिकारी यांचा सूर हा विरोधी पक्षाच्या भूमिकेतच आहे.भाजपला दिव्यामध्ये उत्तम जनाधार आहे.उत्तर भारतीय मतदार मोठ्या प्रमाणात दिवा शहरात असल्याने भाजपची ही हक्काची वोट बँक आहे. २०१७ ला शिवसेनेचे आठ नगरसेवक दिव्यात निवडून आल्याने आगामी पालिका निवडणुकीत युतीत जागा वाटपामध्ये भाजपला संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. शिवसेनेमध्येच इन्कमिंग झाल्याने आठ नगरसेवकांच्या ठिकाणी कुणाला उमेदवारी द्यायची हा प्रश्न शिवसेनेसमोर असताना त्यात युती म्हणून भाजपला सांभाळून घेणे शिवसेनेला शक्य नाही अशी चर्चा स्थानिक पातळीवर असते.

परिणामी दिव्यात भाजपला युतीत संधी मिळणार नाही ही चर्चाच भाजप आणि शिवसेना यांच्यामध्ये दिवा शहरात युतीत बिनसण्याचे प्रमुख कारण असू शकते. दुसरीकडे मागील पाच वर्षात पालिकेच्या माध्यमातून शिवसेना नगरसेवकांनी मोठ्या प्रमाणात विकास निधी आणल्याने त्यांची सर्व जागांवर दावेदारी असणे स्वाभाविक आहे.

दिव्यातील हक्काची वोट बँक शिवसेनेच्या दावणीला का बांधावी असा विचारही भाजपच्या गटातून केला जाऊ शकतो.

युतीत संधी नसल्याने भाजपच्या दिव्यातील पदाधिकाऱ्यांनी स्वबळावर लढण्याच्या दृष्टीने मागील पाच वर्षापासून निवडणुकांची तयारी सुरू केली आहे.भाजपकडे प्रत्येक प्रभागात तुल्यबळ उमेदवार आहेत. दिवा शहरात असलेला उत्तर भारतीय मतदार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकासाचे व्हिजन आणि विविध लोकहिताच्या योजना घेऊन येतील भाजपचे पदाधिकारी लोकांमध्ये जात आहेत. शिवाय शिवसेनेत फूट पडल्याने ठाकरेंची शिवसेना व शिंदेंची शिवसेना यात शिवसेनेचे मतदार विभागले गेल्यास भाजप या ठिकाणी स्वबळावर निवडणूक जिंकेल असा विश्वास भाजपच्या स्थानिक नेतृत्वाला आहे. युतीमध्ये भाजपला प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता नसल्याने किंवा तशी भीती भाजप नेतृत्वाला असल्याने स्वबळावर लढून दिवा शहरातून आपले नगरसेवक ठाणे महानगरपालिकेत पाठवण्याच्या दृष्टीने भाजपचा प्रयत्न दिसतो.

एकीकडे जागा वाटपाच्या फॉर्म्युल्यामुळे दिव्यात युतीत मिठाचा खडा पडलेला असताना भाजपचे दिवा शहर नेतृत्व आणि शिवसेनेचे दिवा शहर नेतृत्व हे एकमेकांचे राजकीय प्रतिस्पर्धी आहेत.युतीत जुळवून घेण्याची क्षमता दोन्ही नेतृत्वामध्ये नाही. या दोन नेत्यांमध्ये सुरू असणारा राजकीय वाद कमी करण्याच्या दृष्टीने भाजप आणि शिवसेनेच्या ठाणे जिल्हा नेतृत्वाकडून कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. किंबहुना दोन्ही पक्षाच्या जिल्हा नेतृत्वाकडून हे वाद वाढतील अशा पद्धतीची भूमिका वारंवार घेतली गेल्याने दिवा शहरात भाजप शिवसेनेचे जुळत नसल्याची चर्चा दोन्ही पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांमध्ये आहे. युतीमध्ये असणारे टोकाचे मतभेद याचा परिणाम आगामी पालिका निवडणुका आणि विधानसभा निवडणुकांवर होऊ शकतो, अशी भीतीही सर्वसामान्य कार्यकर्ते व्यक्त करतात. भाजपच्या दृष्टीने दिवा हा राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर शिवसेनेच्या दृष्टीने सुद्धा हा भाग महत्त्वाचा आहे. दोन्ही पक्षाच्या स्थानिक नेतृत्वांमध्ये मनोमिलन होण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पातळीवर प्रयत्न होत नसल्याने दिव्यात युती नको या भूमिकेला वरिष्ठांचा सुद्धा पाठिंबा आहे का? अशा पद्धतीची कुजबूज दिव्यातील स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये ऐकायला मिळते. दिवा शहरात २०१७ साली शिवसेना हा क्रमांक एकचा पक्ष होता, तर भाजप हा क्रमांक दोन चा पक्ष म्हणून समोर आला होता. आज शिवसेनेत पडलेली फूट लक्षात घेऊन भाजपला इथे महापालिकेत नगरसेवक होण्याची दृष्टीने आशेचा किरण दिसणे यात राजकीय दृष्ट्या काही गैर नाही.मात्र दुसरीकडे शिवसेनेने मागील पाच वर्षात केलेली कामे यामुळे शिवसेनेचा सुद्धा जनाधार वाढल्याची शक्यता शिवसेनेतील नेते बोलून दाखवतात. एकंदरीत भाजप आणि शिवसेनेचे राज्यात जुळलं असलं तरी दिव्यात न जुळण्यामागे प्रमुख कारण हे महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने भाजपला मिळणारी दुय्यम भूमिका हेच असल्याचे स्पष्ट होते.

ठाणे जिल्ह्यातील युतीतील मोठा भाऊ म्हणून शिवसेनेने भाजपच्या स्थानिक पातळीवरील नेत्यांना विश्वासात घेऊन काम केले तर जिल्ह्यात युतीला उत्तम भविष्य आहे.त्यासाठीचा पुढाकार हा शिंदेंच्या शिवसेनेलाच घ्यावा लागेल.



# शालेय राष्ट्रीय स्पर्धेत ठाण्याच्या हर्ष राऊत याला सुवर्णपदक

**ठाणे:** मध्यप्रदेश, भोपाळ येथील तात्या टोपे स्टेडियममध्ये ६ ते ९ जून दरम्यान खेळविण्यात आलेल्या ६६ व्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेत ठाण्याच्या हर्ष राऊत याने १९ वर्षाखालील मुलांच्या गटातील १०० आणि २०० मीटरमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे. शालेय राष्ट्रीय स्पर्धेत दोन्ही स्प्रिंट स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा हर्ष हा ठाणे जिल्ह्यातील पहिला खेळाडू ठरला आहे.

हर्षने १०० मीटरचे अंतर १०.८५ सेकंदात आणि २०० मीटरचे अंतर २२.०९ सेकंदात पार केले. त्याने २०० मीटरमध्ये वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली आणि १०० मीटरमध्ये तो हुकला.

> *ही माझी पहिली राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आहे. १०० मीटर आणि २०० मीटरमध्ये सुवर्णपदक जिंकल्याने खूप आनंद झाला आहे. माझ्या आजपर्यंतच्या प्रवासात मला साथ दिल्याबद्दल मी माझ्या पालकांचे आभार मानतो. आगामी स्पर्धे साठी मी अधिक मेहनत घेईन.'*
>
> *– हर्ष राऊत.*

# पाण्याच्या नवीन लाईनचा लोकार्पण सोहळा झाला मात्र दिव्यातील नागरिकांना आजही भेडसावते पाणीटंचाई – ज्योती पाटील

**दिवा:**–दिव्यातील लोकांना पाणी मिळणार सांगून मुख्यमंत्री यांच्या सभेला गर्दी जमवली खरी परंतु नवीन जलवाहिनीचे लोकार्पण झाले तरीही अद्याप दिव्यातील जनतेला पाणी मिळाले नसून अनेक भागात भीषण पाणीटंचाई जैसे थे आहे, अशी प्रतिक्रिया दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी दिली आहे.दिव्यातील जनतेला गृहीत धरण्याचा प्रकार मागील अनेक वर्षांपासून सुरू असून आता दिव्यातील जनतेने स्वतः पुढाकार घ्यायला हवा अशी भावना ज्योती पाटील यांनी व्यक्त केले आहे.

पाण्याच्या नावाने किती दिवस दिव्यातील जनतेची फसवणूक केली जाणार? आणि दिव्यातील जनता ही पाण्याच्या नावाखाली किती वेळा राजकारण्यांना बळी पडणार? असा सवाल ज्योती पाटील यांनी उपस्थित केला आहे. दिवा शहरात आजही भीषण पाणी टंचाई असून नवीन जलवाहिनीचे लोकार्पण झाले तरी पाणी प्रश्न मात्र अद्यापही सुटलेला नाही. नवीन जलवाहिनीचे लोकार्पण झाले की दिव्यातील प्राणी प्रश्न सुटेल असे अनेकांना सांगून सभेसाठी गर्दी जमवली. आता लोक आम्हाला प्रश्न विचारतात की पाण्यासाठी गेलो मात्र पाणी काही आले नाही.

यावर आता पालिका प्रशासन काय उत्तर देणार?असाही सवाल ज्योती पाटील यांनी केला आहे. पालिका प्रशासनाने अंतर्गत पाईपलाईन शहरात नियोजनपूर्वक टाकल्याशिवाय पाणी प्रश्न सुटणार नाही हे आम्ही वारंवार सांगत आहोत.शो बाजी करण्यापेक्षा महापालिकेने नागरिकांच्या सोयी सुविधांकडे लक्ष द्यावे असा टोला ज्योती पाटील यांनी लगावला आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :–**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे–४००६१२.

# जलवाहिनीच्या लोखंडी चेंबरचे झाकण तुटून रिक्षाचे चाक अडकले

## रिक्षाचालक जखमी



**ठाणे:** घोडबंदर रोड,पातलीपाडा ब्रीजच्या बाजूला असलेल्या सेवा रस्त्यावरील जलवाहिनीच्या लोखंडी चेंबरचे झाकण तुटून त्यामध्ये रिक्षाचे पुढे चाक अडकल्याची घटना गुरुवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत पातलीपाडा येथील रिक्षाचालक संजय पारखे (५५) हे किरकोळ जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने धाव घेतली. तदपूर्वी स्थानिक नागरिकांनी अडकलेल्या रिक्षा त्या चेंबरमधून बाहेर काढले. तर आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सुरक्षेच्या दृष्टीने त्या चेंबर भोवती धोकापट्टी बांधण्यात आली आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# मेट्रो ब्रीजवरून सळई पडून गाडीत घुसली; चालक थोडक्यात बचावला

**ठाणे:** एलबीएस रोड, भारत पेट्रोल पंप जवळ, तीन हात नाका, या ठिकाणी मेट्रो ब्रीजचे काम चालू असताना ब्रीजवर काम करणाऱ्या एका कामगाराच्या हातामधून लोखंडी सळई सुटून मुलुंड चेक नाक्याकडून तीन हात नाक्याकडे येणाऱ्या चारचाकी गाडीवर पडल्याची घटना सोमवारी दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास समोर आली. सळई पडल्यानंतर अक्षरशः गाडीचे छप्पर फाडून आत आली. सुदैवाने थोडक्यात चालक बचावला. ही घटना घडली तेंव्हा गाडीतर तीन प्रवासी होते. त्यांना कोणालाही दुखापत झालेली नाही. ही गाडी संजय यादव यांच्या मालकीची असून ती गाडी चालक जितेंद्र यादव हा भांडूप मार्गे कोलशेत कडे घेऊन येत होता. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांनी धाव घेत, रस्त्याच्या बाजूला करण्यात आली आहे. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे–६१२ ता/जि–ठाणे राज्य–महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क–८०८०९७७९५५
**संपादक–सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**



## त्या मृताच्या नातेवाईकांना भाजपाकडून आर्थिक मदत, ५० हजारांचा धनादेश सुपूर्द

ठाणे: दिवा विभागात नुकत्याच पार पडलेल्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमात सियाराम विश्वकर्मा (५५) यांना शॉक लागून त्यांचा मृत्यू झाला. त्या कुटुंबियांचे भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अमरजीत मिश्रा यांनी दिव्यातील त्यांच्या घरी जाऊन सांत्वन केले. याशिवाय त्यांनी त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी ५० हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी दिवा मंडळातील मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे, दिलीप भोईर, युवराज यादव ,सचिन भोईर, ज्योती पाटील रोशन भगत, डॉ. विद्यासागर दुबे, जीलाजित तिवारी,राहुल शाहू, वीरेंद्र गुप्ता, अवधराज राजभर, प्रशांत आंबोनकार, अमन गुप्ता आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## मुख्यमंत्र्यांचे दिवा वासीयांना मोठे गिफ्ट दिव्यासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर पाच कोटींची तरतूद

**दिवा:–** गेल्या अनेक वर्षांची दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन होण्याची येथील नागरिकांची मागणी मुख्यमंत्र्यांनी मंजूर करत दिव्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण करण्याची घोषणा केली.या पोलीस ठाण्यासाठी पाच कोटींच्या निधीची तरतूद केल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवा येथील सभेत जाहीर केले.

पालिका आयुक्तांना योग्य त्या जागेची तातडीने पाहणी करून यासंबंधीतील पोलीस स्टेशन उभारणीची कार्यवाही सुरू करण्याचे निर्देशही या सभेत मुख्यमंत्र्यांनी दिले. दिवा येथे विविध विकास कामांच्या लोकार्पणाचा सोहळा शिवसेनेमार्फत आयोजित करण्यात आला होता यावेळी ते बोलत होते.



## ठाकरेंच्या शिवसेनेकडून दिव्यात मोफत दाखले वाटप शिबिर, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिवा:–** ठाकरेंच्या शिवसेनेने दिव्यात लोकहिताचे उपक्रम राबवण्यावर भर दिला असून याचाच भाग म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रविवारी सुमित हॉल येथे मोफत दाखले वाटप शिबिराचे राबविण्यात आले.

उत्पन्नाचा दाखला, वय, राष्ट्रीयत्व अधिवास दाखला, ज्येष्ठ नागरिकांचा दाखला, स्थानिक वास्तव्याचा दाखला आदी दाखले या शिबिरात नागरिकांना मोफत काढून देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर विभागाकडून करण्यात आले होते. कार्यक्रमाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिवा शहरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबिराचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला.दिवा पूर्वेकडील मयूर हॉटेल समोरील सुमित हॉल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





## शिवसेनेकडून दिवा स्थानकातील सरकत्या जिन्याच्या कामाची पाहणी

**दिवा:–** खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने होत असलेल्या दिवा स्टेशन पूर्व येथील स्वयंचलित सरकत्या जिन्याचे काम अंतिम टप्प्यात आलं आहे.

सदर सरकत्या जिन्याच्या कामाची पाहणी मा.उपमहापौर, शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी,उपशहर प्रमुख नगरसेवक शैलेश पाटील, दिवा रेल्वे प्रवासी संघटना अध्यक्ष, उपशहरप्रमुख ॲड.आदेश भगत, विभागप्रमुख उमेश भगत व रेल्वे अधिकारी यांनी केली.

# जिल्ह्यातील २७ अनधिकृत माध्यमिक शाळांपैकी १७ शाळा होणार बंद

**‘माध्यमिक अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नका’**
शिक्षणाधिकारी दहितुले

*ठाणे: संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनधिकृत शाळांवर ठाणे जिल्हा परिषदेच्या वतीने दंडात्मक कारवाई केली आहे. जिल्ह्यातील २७ माध्यमिक शाळा अनधिकृत असून १० अनधिकृत शाळा सुरू आहेत तर १७ शाळांनी शाळा बंद करण्याबाबतचे हमीपत्र सादर केले आहे. तरी पालकांना सुचित करण्यात येते की पुढील शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता त्या अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नये. असे आवाहन ठाणे जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाने केले आहे.*

### अनधिकृत सुरू असलेल्या शाळांची यादी

- **अल मुनीहाज सेकंडरी हायस्कुल,** बेलापूर, नवी मुंबई
- **स्टार इंग्लिश हायस्कुल,** ठाणे मनपा क्षेत्र
- **डिवाईन ग्रेस हायस्कुल,** वज्रेश्वरी ता. भिवंडी
- **बी.एस.एस इंग्लिश स्कूल,** गणेशनगर, चितळसर, मानपाडा ठाणे
- **श्रीमती कावेरीताई पाटीलइंग्लिश मिडीअम स्कूल,**कळवा
- **आर. एन. इंग्लिश स्कूल,** कोनगाव, भिवंडी, ठाणे.
- **फरान इंग्लिश मिडीअम स्कुल,** गौरीपाडा, भिवंडी जि.ठाणे
- **ओमकार इंटरनॅशनल स्कुल,**चौळे, ता. कल्याण जि.ठाणे
- **नारायणा ई-टेक्नो स्कूल,** ढोकाळी गाव, ठाणे (प) ता. जि.ठाणे
- **देविका इंग्लिश मिडीअम स्कूल,** रेतीबंदर रोड, मौजे काल्हेर,ता. भिवंडी,जि.ठाणे

### शाळा बंद करण्याबाबतचे हमीपत्र सादर केलेल्या अनधिकृत शाळा

- **सेंट पॉल इंग्लिश सेंकडरी हायस्कूल,** चिंचपाडा, नवी मुंबई मनपा क्षेत्र
- **श्री साई ज्योती सेकंडरी स्कुल,** कोपरखैरणे, नवी मुंबई
- **प्रगती विद्यामंदिर** अंबरनाथ
- **युनिक इंग्लिश मिडीयम स्कुल,** कल्याण
- **होली मारीया कॉन्व्हेन्ट हायस्कुल,** ठाणे मनपा क्षेत्र
- **सिम्बॉयसिस कॉन्व्हेंट हायस्कुल,** ठाणे
- **आतमन अॅकॅडमी ठाणे,** ठाणे मनपा क्षेत्र
- **अरुण ज्योत विदयालय ठाणे,** ठाणे मनपा क्षेत्र
- **नॅशनल इंग्लिश स्कुल,** दापोडे ता.भिवंडी
- **नूर हायस्कूल अॅन्ड ज्यु. कॉलेज,** नूर बाग अल्मास कॉलनी रोड, कौसा मुंब्रा ठाणे
- **श्रीम. भागीरथी वझे एज्युकेशन व वेल्फेअर ट्रस्ट,** मानपाडा गाव डोंबिवली (पु) जि.ठाणे
- **श्री. विद्या ज्योती स्कूल,डावले,** ठाणे
- **डायमेशन इंग्लिश स्कूल,** सर्व्हे नं.६०/३ मौजे कौसा, मुंब्रा, जि.ठाणे
- **आदर्श विद्यालय,** लोढा हेवन कल्याण
- **पारसिक स्पेशल स्कुल,** मिरा भाईंदर ठाणे
- **आरकॉम इंग्लिश स्कुल,** ठाणे
- **नालंदा हिंदी विद्यालय,** ठाणे मनपा क्षेत्र

> *अनधिकृत शाळांची यादी प्रकाशित करण्यामागे हाच उद्देश आहे.की, पालकांनी पाल्याचे माध्यमिक शाळेत प्रवेश घेताना अनधिकृत शाळेत प्रवेश करू नये. पालकांनी अधिक माहिती घेऊनच पाल्याचे शाळेत प्रवेश निश्चित करावे*
>
> *- ललीता दहितुले, शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग ठाणे.*

# केंद्र शासनाच्या पथकाने केली जलशक्ती अभियानाच्या जिल्ह्यातील कामांची पाहणी

**ठाणे :**केंद्र शासनाच्या जलशक्ती अभियान -कॅच दी रेन अंतर्गत जिल्ह्यातील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या जलसंधारणाच्या कामांची पाहणी केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या सदस्या तथा या अभियानाच्या नोडल अधिकारी जागृती सिंगला यांनी सोमवारी केली.


केंद्र शासनाच्या जलशक्ती अभियानाच्या अंमलबजावणीची माहिती घेण्यासाठी निती आयोगाच्या सदस्या तथा नोडल अधिकारी श्रीमती सिंगला या ठाणे जिल्हा दौऱ्यावर आल्या होत्या. यासंदर्भात त्यांनी काल जिल्ह्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणेची आढावा बैठक घेतली. आज त्यांनी जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसमवेत भिवंडी तालुक्यातील कोनगाव, खळिंग, कोशिंबे गावांतील विविध कामांची पाहणी केली.

जिल्हा परिषदेचे लघु पाटबंधारे विभागाकडून अमृत सरोवर अंतर्गत करण्यात आलेल्या गाळ काढणे, बंधारे इत्यादी कामांचा तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत आदिवासी विकास कार्यक्रम अंतर्गत करण्यात आलेल्या डीप ऍक्वेफेर (खोल भूस्तर) पुर्नभरण कामांची पाहणी केली. तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागा मार्फत राबविण्यात आलेल्या बोअरवेलद्वारे छतावरील पावसाचे पाणी संकलन ( () ) या योजनेची त्यांनी विशेष प्रशंसा केली. अशा प्रकारची जास्तीत जास्त कामे घेऊन भूजलस्तर वाढविण्यात यावे, अशा सूचना केल्या. या योजने बाबत पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अर्जुन गोळे व उप अभियंता (यांत्रिकी) संजय सुकटे यांनी माहिती दिली.

सद्य:स्थितीत या योजनेची २५ कामे पूर्ण झाली असून १३ कामे प्रगतीत असल्याचे सांगितले. यापुढील राबविण्यात येणाऱ्या जिल्हा परिषद शाळेतील लघु नळ योजनेमध्ये या योजनेचा समाविष्ट करुन भुजलाची पातळी वाढविण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांचा मानस असल्याचे सांगितले.

# ठामपा मालमत्ता करापोटी अवघ्या ६६ दिवसात २०० कोटींची विक्रमी वसुली

**ठाणे :** मालमत्ता कराच्या पहिल्या तिमाहीत ठाणे महापालिकेने आर्थिक वर्षाच्या ६६ दिवसात २०० कोटी रुपयांची विक्रमी मालमत्ता कर वसुली केली आहे. ठाणेकरांनी मालमत्ता कर भरणा करण्यास दिलेला अभूतपूर्व प्रतिसाद प्रशंसनीय असल्याचे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले आहे. ही वाढ गतवर्षीपेक्षा ९० टक्के असून यंदा एक हजार कोटी रुपये वसुलीचे उद्देश महापालिका प्रशासनाने डोळ्यासमोर ठेवला आहे.




ठाणे महापालिकेने चालू (२०२३-२४) आर्थिक वर्षाची देयके ०१ एप्रिल २०२३ रोजी तयार करुन याबाबत नागरिकांना एस.एम.एस द्वारे अवगत केले होते.या एस.एम.एस द्वारे मालमत्ता कराची देयके डाऊनलोड करणे, प्रिंट करणे तसेच ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरण्याकरिता अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मालमत्ता कर नागरिकांना भरणे सोईचे व्हावे यासाठी सर्व प्रभागसमिती कार्यालयात कर संकलन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून कार्यालयीन वेळेत तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सदर केंद्रे सुरू ठेवण्यात आली आहेत. मालमत्ता कराची देयके प्रभाग समिती निहाय सर्व मालमत्ता धारकांना वितरीत करण्यात असून सदर मालमत्ता देयके संबंधितांना प्राप्त झालीत की नाही याची खातरजमा करुन कर भरणेबाबत आवाहन करण्यात आले. महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाला यावर्षी ९०० कोटी इतके वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.



# पावसाळ्यात वाहतूककोंडी होणार नाही या दृष्टीने नियोजन करावे-आयुक्त बांगर

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्टेशनबाहेरील रस्ता हा फेरीवाला मुक्त केल्यामुळे येथून नियमित ये-जा करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळाला असल्याच्या नागरिकांच्या प्रतिक्रिया विविध माध्यमातून येत आहेत. सदरच्या परिसरात महापालिका व वाहतूक पोलीस यांच्या समन्वयाने करण्यात आलेली कार्यवाही कायमस्वरुपी ठेवावी. या पार्श्वभूमीवर पावसाळ्यात देखील शहरातील महत्वाच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होणार नाही या दृष्टीने उपाययोजना करुन तात्काळ त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत सर्व संबंधितांना दिले.

ठाणे रेल्वेस्थानकाच्या धर्तीवर वर्दळीच्या ठिकाणी देखील वाहतूक नियोजन होणे गरजेचे आहे. गावदेवी परिसर हा वर्दळीचे ठिकाण असून वाहतूक आणि पादचारी यांचे परिचलन योग्यपध्दतीने व्हावे यासाठी तेथे सद्यस्थितीत लावण्यात आलेले बोलार्ड कायमस्वरुपी ठेवावे, पोलार्ड काढल्यास तेथून वाहतूक सुरू होवून पादचाऱ्यांना त्रासाचे ठरेल. मात्र हे करत असताना कोणाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. या परिसरात पादचाऱ्यांना विशेषत: महिला वर्गाला ये-जा करताना गैरसोय होणार नाही या दृष्टीने वाहतूकीचे परिचालन करण्याबाबत महापालिका व वाहतूक विभागाने समन्वय साधून निर्णय घ्यावा अशा सूचना आयुक्त बांगर यांनी बैठकीत दिल्या.

त्याचपध्दतीने तीन हात नाका ते नितिन जंक्शन सेवा रस्त्यावर अनधिकृतपणे गाड्या उभ्या असतील तर त्यांच्यावर कारवाई करुन दंड आकारण्यात यावा, जेणेकरुन सेवा रस्त्यावर गाड्या उभ्या राहणार नाहीत. तसेच रस्त्याच्या बाजूला असलेल्या शो रुमच्या गाड्या असतील तर त्यांना देखील सूचना देवून गाड्या रस्त्यावर उभ्या राहणार नाही याबाबत दक्षता घेणेबाबत सूचित करावे. तसेच वागळे इस्टेट रोड नंबर २२ येथील पासपोर्ट कार्यालय येथे समांतर पार्किंग असून त्या ठिकाणी पी-१, पी -२ चे फलक लावावेत. तसेच गोखले रोड येथे देखील पी-१, पी -२ चे बोर्ड लावण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या

ठाणे शहरातील नागरिकरण झपाट्याने होत आहे, त्यामुळे दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे, तसेच पूर्वद्रुतगती महामार्गावरुन बाहेरगावी जाणारी वाहने मोठ्या प्रमाणावर असल्याने सर्वच ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढत आहे. शहरामध्ये कोणत्याही ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही या दृष्टीने वाहतूक नियंत्रण विभाग व महापालिकेने संयुक्तपणे कार्यवाही करुन वाहतूकीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करावेत, तसेच वाहतूक सुरळीत राहण्यासाठी ट्रॅफिक वॉर्डनची देखील नियुक्त करावेत व त्यांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे काम होईल या दृष्टीने नियंत्रण ठेवण्याबाबतही आयुक्तांनी सूचना दिल्या.

गोखले रोड येथील समर्थ भांडार, रहेजा परिसर, तीन पेट्रोलपंप येथील आराधना परिसर येथील रस्ता दुभाजक आणि खोपट, फ्लॉवर व्हॅलीकडून कॅडबरी जंक्शनकडे येणाऱ्या सर्व्हिस रोडवर कर्व्ह दुभाजक टाकावेत. तसेच तात्पुरते डिव्हायडर सुद्धा प्लॅस्टिकचे न ठेवता कॉंक्रिटचे ठेवावेत, तसेच दुभाजकामध्ये जागा राहणार नाही याची काळजी घ्यावी.

शहरातील माजिवडा, मॉडेला नाका, तीन हात नाका,कळवा आदी जंक्शनवरुन मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. त्यामुळे सदर ठिकाणी कॉंक्रिटीकरण पद्धतीने काम करणे गरजेचे आहे तसेच ही ही सर्व कामे पावसाळ्यापूर्वी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त बांगर यांनी दिले.

स्पीडब्रेकरबाबत आयआरसीच्या मार्गदर्शक सूचना आहेत, त्याप्रमाणे शहरातील रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक कार्यकारी अभियत्यांनी आपापल्या विभागात ड्राईव्ह घेवून जे स्पीडब्रेकर आयआरसीच्या नॉर्मनुसार नाहीत त्याची यादी करा. रबराचे स्पीड ब्रेकर असतील ते काढून टाका. ज्या ठिकाणी तात्पुरते स्पीडब्रेकर बसवायचे असतील तर ते देखील आयआरसीच्या नॉर्मनुसार बसवावेत, तसेच शहरातील सर्व स्पीडब्रेकर आयआरसीच्या नॉर्मनुसार असतील याची सर्वांनी दक्षता घ्यावी अशा सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

# नद्यांचे पुनरुज्जीकरण करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज

## - प्रा. डॉ. स्नेहल दोंदे यांचे प्रतिपादन

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील उल्हास, कुंभेरी, कामवारी, वालधुनी या शहरी भागातून वाहणाऱ्या नद्यांच्या पुनरुज्जीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जलनायक आणि ठाणे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. स्नेहल दोंदे यांनी केले आहे. 'चला जाणूया नदीला' या उपक्रमांतर्गत ठाणे महापालिकेने आयोजित केलेल्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या.



राज्य सरकारने हाती घेतलेल्या 'चला जाणूया नदीला' या उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यातील महापालिका व नगर परिषदांची जिल्हास्तरीय बैठक आणि कार्यशाळा गुरुवारी ठाणे महापालिका मुख्यालयात झाली. या कार्यशाळेत कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर या महापालिका, तसेच, कुळगाव-बदलापूर, अंबरनाथ या नगर परिषदा यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे होते. नदीवरील प्रदूषण, अतिक्रमण यांचा अभ्यास, नदी संवाद यात्रा, नदीचे पुनरुज्जीकरण करण्यासाठीचा आराखडा तयार करणे व त्याची अमलबजावणी करणे, हे 'चला जाणूया नदीला' या अभियानाचे उद्दिष्ट आहे. या अभियानाच्या ठाणे जिल्ह्याच्या समन्वयक प्रा. डॉ. स्नेहल दोंदे आहेत. त्या जलनायक म्हणून यशदा येथे कार्यरत असून त्यांचा नदी संवर्धनाबाबत अभ्यास आहे.

नद्यांचे संरक्षण व जैवविविधतेचे संवर्धन करणे, शाश्वत विकास साधणे ही काळाची गरज आहे. त्यानुसार, कृती करून नद्या प्रदूषण मुक्त राखणे हे सगळ्यांचे कर्तव्य आहे. त्यामुळे, नदी प्रदूषणाकडे होत असलेले दुर्लक्ष ही चिंतेची बाब असल्याचे प्रा. दोंदे यांनी नमूद केले. ठाणे जिल्ह्यातील उल्हास, कुंभेरी, कामवारी, वालधुनी या शहरी भागातून वाहणाऱ्या नद्या त्यात विसर्जित होणारे सांडपाणी व नागरी वस्त्यांमधून येणारे मलजल यामुळे प्रदूषित होत आहेत. त्या पुनरुज्जीवीत करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. हाच 'चला जाणूया नदीला' या अभियानाचा उद्देश असल्याचे प्रा. दोंदे म्हणाल्या.

दरम्यान, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी अभियानात आतापर्यंत झालेल्या कामाचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश बैठकीचे अध्यक्ष आणि ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांनी दिले. कार्यशाळेची माहिती देणारे प्रास्ताविक मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी केले.

# ऑनलाईन धर्मांतर कसे होऊ शकते?

**ठाणे :** प्रतिनिधी गाझीयाबाद येथील एका पोलीस अधिकाऱ्याने मुंब्रा येथील मुलांचे धर्मांतर करण्यात आले असल्याचे जाहीर केले आहे. मात्र धर्मांतर करण्यासाठी प्रत्येक धर्माची विशिष्ट्य कार्यपद्धती असते त्यासाठी प्रत्यक्ष धार्मिक स्थळी उपस्थित राहून धार्मिक विधी पार पाडाव्या लागतात असे असताना ऑनलाईन गेम खेळताना धर्मांतर कसे होऊ शकते? असा सवाल ठाणे जिल्हा इंटक अध्यक्ष आणि जिल्हा काँग्रेस मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे यांनी उपस्थित केला असून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

**गाझियाबाद प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी काँग्रेसचे सचिन शिंदे यांची मागणी**

महाराष्ट्रात सध्या धार्मिक विद्वेषातून दंगली घडवण्यात येत आहेत तर उत्तरप्रदेशातील गाझीयाबाद येथील एका आयपीएस अधिकाऱ्याने मुंब्रा येथे ४०० मुलांचे धर्मांतर झाले असल्याचे जाहीर केले आहे,हा मुंब्रा आणि परिसराला बदनाम करण्याचा कींबहुना हिंदू धर्मालाही बदनाम करण्याचा डाव आहे.हिंदू धर्मातील मुले एवढी मुर्ख नाहीत की ती स्वत:चे धर्मांतर तेही ऑनलाईन पद्धतीने करुन घेतील? असा सवाल विचारतानाच ऑनलाईन गेम खेळताना धर्मांतर कसे होऊ शकते असा प्रश्न सचिन शिंदे यांनी उपस्थित केला आहे.प्रत्येक धर्मात धर्मांतराची एक विशिष्ट कार्यपद्धती असे त्यासाठी ठराविक विधी पार पाडाव्या लागतात असे करूनही काही कालावधी नंतर धर्मांतराला मान्यता दिली जाते . धर्मांतर केल्यानंतर नावे बदलण्याचीही प्रथा आहे असे असताना ऑनलाईन धर्मांतर तेही गेम खेळताना कसे होऊ शकते याची सखोल चौकशी केंद्र सरकारने करावी अशी मागणी सचिन शिंदे यांनी केली आहे .

# जिल्ह्यात बालकामगार आढळल्यास संपर्क करा

## कामगार उपायुक्तांचे आवाहन

**ठाणे :** बालकामगार ही अनिष्ट प्रथा निर्मूलन करण्याच्या अनुषंगाने बाल कामगारांना कामावर ठेवण्यात येऊ नये, तसेच बाल कामगार आढळून आल्यास कामगार विभागाच्या ०२२-२६५७२९२९ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कामगार उप आयुक्त संतोष भोसले यांनी केले आहे.

१२ जून रोजी साजरा होणाऱ्या जागतिक बाल कामगार दिनानिमित्त कामगार विभागाच्या वतीने विविध ठिकाणी जनजागृती करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने कामगार उपायुक्त भोसले यांनी जिल्ह्यातील दुकाने, आस्थापना, कारखाने, हॉटेल्स, ढाबा, गॅरेजेस, विटभट्टी व इतर आस्थापना यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे बाल कामगारांना कामावर ठेवू नये, असे आवाहन केले आहे. त्यात नमूद केले आहे की, बाल व किशोरवयीन कामगार कामावर करुन घेण्यास मनाई करण्यात आली आहे. बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, २०१६ अन्वये १४ वर्षाखालील बालकांना कामावर ठेवण्यास अथवा काम देण्यास कायद्याने प्रतिबंध केलेला आहे.

अशी बाब निदर्शनास आल्यास सदर अधिनियमातील तरतुदीनुसार ६ महिने ते २ वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद असून सुमारे २० हजार ते ५० हजार रुपये दंडाची तरतूद आहे. तसेच १४ ते १८ वर्ष वयोगटाच्या किशोरवयीन कामगारांना सर्व धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये काम करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे, असेही यात नमूद केले आहे.

# हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका प्रवेशासाठी २३ जूनपर्यंत अर्ज करा

**ठाणे :** केंद्र सरकारच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहासत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षाकरिता येत्या २३ जून २०२३ पर्यंत प्रवेश अर्ज करावेत, असे आवाहन वस्त्रोद्योग आयुक्त एम.जे. प्रदिप चंदन यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडिशा) करीता १३ जागा, आर्थिकदृष्या दुर्बल घटकाकरीता १ जागा आणि वेंकटगिरी करीता २ जागेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्याकरीता नागपूर, सोलापूर, मुंबई, औरंगाबाद प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडून २० जून २०२३ पर्यंत विहीत नमुन्यात प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी इच्छुक उमेदवारांनी २३ जून २०२३ पर्यंत संबंधित प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग यांच्या कार्यालयात देखील उपलब्ध आहेत, अशी माहिती वस्त्रोद्योग आयुक्त प्रदीप चंदन यांनी दिली आहे.

# ऐतिहासिक ठाणे रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास होणार

## २०२४ मध्ये होणार कामाला सुरू -खासदार राजन विचारे

**ठाणे:** तोंडावर आलेल्या पावसाळ्यात ठाणे रेल्वे स्थानकातील पादचारी पुलाचे काम मार्गी लावण्यासाठी आणि फलाटावरील काढलेले पत्रे पुन्हा बसवावे असे अधिकाऱ्यांना बजावले. त्यावेळी अधिकाऱ्यांनी येत्या १० ते १५ दिवसात काम पूर्ण होतील असे आश्वासन दिले. तसेच ऐतिहासिक ठाणे रेल्वे स्थानकाचा पुनर्विकासाठी ९८३ कोटी मंजूर करण्यात आले असून ते काम जानेवारी २०२४ पर्यंत सुरू होणार असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आल्याची माहिती खासदार राजन विचारे यांनी दिली.

खासदार राजन विचारे यांनी शुक्रवार सायंकाळी ठाणे रेल्वे स्थानकाचा पाहणी दौरा रेल्वे अधिकाऱ्यांच्या समवेत करण्यात आला. तत्पूर्वी रेल्वे लँड डेव्हलपमेंट अथोरिटीचे डी जी एम श्री खोत यांनी या प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यानंतर आगामी पावसाळा लक्षात घेता ठाणे रेल्वे स्थानकातील ठाणे महापालिकेच्या सहाय्याने रेल्वे मार्फत पब्लिक पादचारी पुलाचे काम निधी अभावी रखडले होते. यासंदर्भात ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याशी पत्रव्यवहार व चर्चा करून उर्वरित निधी लवकरात लवकर रेल्वेकडे जमा करावा जेणेकरून पादचारी पुलाचे काम मार्गी लागेल. तसेच फलाटावरील काढलेले पत्रे पुन्हा बसवावे असे अधिकाऱ्यांना बजावले. यावेळी अधिकाऱ्यांनी १० ते १५ दिवसात काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच खासदार विचारे यांनी शौचालयाच्या अस्वच्छतेवर नाराजी व्यक्त करून प्रवाशांकडून बेसुमार पैसे लुटणाऱ्या कंत्राटी ठेकेदाराला धारेवर धरले. ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवेशद्वाराजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या प्रतीक्षा कक्षाची पाहणी करून त्या ठिकाणी महिलांसाठी व पोलिसांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करावे अशी मागणी त्यावेळी केली. वाहतूक शाखेच्या पोलिसांना तसेच स्थानकाबाहेर पडणाऱ्या प्रवाशांना अडथळा ठरणारी वाहने येथे उभे करून देऊ नका अशी तंबी त्यांना दिली.

खासदार विचारे यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना प्रवाशांच्या मूलभूत समस्यांकडे लक्ष द्या. रेल्वेच्या फेऱ्यात वाढ, शौचालय, शुद्ध पिण्याचे पाणी व सरकते जिने, सुरक्षा यामध्ये वाढ करून काळजीने लक्ष घ्या असे सांगितले.

# खारटन रोडवरील शौचालय सात दिवसात पूर्ववत झाले नाहीतर महापालिकेवर टमरेल आंदोलन

## काँग्रेसच्या सचिन शिंदे यांचा इशारा

**ठाणे :** स्वच्छ ठाणे सुंदर ठाण्यातील सार्वजनिक शौचालयांसाठी १०० कोटींचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेला दिला असल्याचे बोलले जात आहे. मात्र पावसाळा सुरु होत आला तरी देखील शहरातील सार्वजनिक शौचालयांची दुरुस्तीच सुरु झाली नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. खारटन रोड येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती अद्यापही झाली नसून त्याची फाईलच अद्याप तयार नसल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे. परंतु येत्या सात दिवसात येथील शौचालयाची दुरुस्ती झाली नाही तर महापालिका मुख्यालयासमोर टमरेल आंदोलन केले जाईल असा इशारा ठाणे काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे यांनी दिला.

ठाण्यातील शौचालयांच्या दुरुस्तीसाठी काही महिन्यापूर्वी राज्य शासनाच्या माध्यमातून सुमारे १०० कोटींचा निधी देऊ केला आहे. त्यानुसार शहरातील सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती केली जाणार आहे. महापालिकेने शहरातील शौचालयांचा सर्वे करुन दुरुस्तीसाठी निधी घेतला आहे.असे असतांनाही शहरातील शौचालयांची अवस्था दयनीय असल्याचेच दिसत आहे. खारटन रोड भागातील शौचालयाच्या दुरुस्तीसाठी तीन महिन्यापूर्वी मागणी करण्यात आली



होती. तसेच येथे केअरटेकर असावा अशी देखील मागणी केली होती.परंतु या शौचालयाची दुरुस्ती झाली नाहीच, शिवाय केअरटेकरही अद्याप दिला नसल्याने शिंदे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शनिवारी सकाळी शिंदे यांनी खारटन रोड भागातील शौचालयाची पाहणी केली. तसेच येथील रहिवाशांशी चर्चा देखील केली. रहिवाशांनी शौचालयाच्या नादुरुस्तीविषयी आणि असुविधेविषयी पाढाच त्यांच्या समोर वाचून दाखविला.

# पाणी टंचाईवर विंधन विहिरीचा उतारा

## ग्रामीण भागासाठी ३३० विंधन विहीरी मंजूर

## ३६ विहिरांचे खोदकाम पूर्ण

**ठाणे :** धरणाचा जिल्हा म्हणून टेंभा मिळविणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात दरवर्षी पाणी टंचाई ही पाचवीला पुजलेली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने आणखी नाविन्यपूर्ण योजना म्हणजे विंधन विहिरींवर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला आहे. २०२२ - २३ या वर्षी ३३० विंधन विहारीना जिल्हा प्रशासनाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. त्यातच अवघ्या ३६ विंधन विहिरींच्या खोदकामे पूर्ण झाल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले. यामुळे काही प्रमाणात ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा मिळेल असेच दिसत आहे.

ठाणे जिल्ह्यात दरवर्षी मार्च ते मे या तीन महिन्याच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईची समस्या भेडसावत असते. ही बाब लक्षात घेवून जिल्हा प्रशासनाने ऑक्टोंबर २०२२ ते जून २०२३ या कालावधीत पाणी टंचाईग्रस्त गाव पाड्यांवरील पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात येत असतो. त्यानुसार यंदाच्या वर्षी देखील पाणी टंचाई आरखडा तयार करण्यात आला असून यामध्ये ग्रामीण भागातील पाणी टंचाईची समस्या निवारण्यासाठी विंधन विहिरींवर विशेष भर देण्यात येत असतो.

दरम्यान, ऑक्टोंबर २०२२ ते जून २०२३ या कालावधीसाठी ३३० विंधन विहिरींना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी ३९ विहिरींचे खोदकाम पूर्ण झाले असल्याचा दावा जिल्हा परिषद प्रशासनाने केला आहे. तर, १६ विंधन विहिरींचे काम पूर्ण झाले असून ३ ठिकाणी विहिरींचे काम अयशस्वी झाले आहे. तसेच ७ ठिकाणी हातपंप देखील बसविण्यात असल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाने दिली. तर, शहापूर तालुक्यातील एका ठिकाणी ६० फुटापेक्षा अधिक खोल खोदकाम काम करावे लागणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली. ग्रामीण भागातील पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी टंचाई आराखड्याच्या माध्यमतून विंधन विहिरींच्या कामांना गती देण्यात येत आहे. असे असले तरी, ६० मीटर पेक्षा जास्त खोलीकरण करायचे झाल्यास भूजल सर्वेक्षण विभागाच्या शिफारसी नंतरच प्रांत अधिकाऱ्यांकडून देण्यात येत असते. ही प्रक्रिया वेळ खावू असल्यामुळे अनेकदा विंधन विहिरींच्या खोदकामास विलंब होत असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

# फिरत्या पथक शाळेतील १४५ मुलांना मिळाला शाळेमध्ये प्रवेश

## रस्त्यावरील मुलांसाठी धोरण आखण्यासाठी पाठपुरावा करणार आमदार निरंजन डावखरे



**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील रस्त्यांवरील उपेक्षित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या फिरते पथक शाळेतील १४५ मुला-मुलींना महापालिका व खासगी अनुदानित शाळांमध्ये प्रवेश मिळाला आहे. या मुलांना शाळेचे साहित्य, गणवेश वितरणाचा कार्यक्रम आज आमदार निरंजन डावखरे व जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या उपस्थितीत पार पडला. रस्त्यावर राहणाऱ्या या मुलांना शिक्षणाच्या, समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे हे पाऊल स्तुत्य असून यासंदर्भात धोरण करण्यासाठी अधिवेशनात पाठपुरावा करण्यात येईल, असे आमदार डावखरे यांनी यावेळी सांगितले.

महिला व बालविकास विभाग, एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या फिरते पथक शाळेतील मुलांसाठी एक पाऊल प्रगतीकडे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनमध्ये झालेल्या या आगळावेगळ्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डावखरे व जिल्हाधिकारी शिनगारे उपस्थित होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी, ठाणे महानगरपालिकेच्या उपायुक्त वर्षा दीक्षित, पोलीस निरीक्षक मनिष पाटील, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा राणी बैसाणे, भरत पोखरकर, स्वाती रणधिर, स्वयंसेवी संस्थाचे स्वाती सिंग, विजय जाधव, रमेश थोरात, खान आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना गणवेश, शालेय साहित्याचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले.

आमदार डावखरे म्हणाले की, जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्ह्याचे नियोजन करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आतापर्यंत येत होतो. मात्र, आजच्या कार्यक्रमामुळे देशाच्या भावी पिढीच्या नियोजनासाठी आल्याचा आनंद झाला आहे. उपेक्षित, रस्त्यावर राहणाऱ्या या मुलांना शिक्षणाच्या, समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभागाचा हा उपक्रम चांगला आहे. मात्र, ही मुले या प्रवाहात कायम टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. रस्त्यांवरील मुलांसाठी वेगळे धोरण ठरविण्यासाठी विधीमंडळात पाठपुरावा करण्यात येईल.

जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, शाळाबाह्य मुलांना औपचारिक शिक्षणात समावून घेण्याचा हा प्रयत्न म्हणजे सामाजिक ऋण फेडण्याची संधी आहे. ठाणे जिल्ह्यात रस्त्यावर राहणारी सर्वाधिक मुले सापडणे ही अभिमानाची गोष्ट नाही. यापैकी आता १४५ मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा एक पाऊल पुढे हा पहिला टप्पा आहे. उर्वरित मुलांनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा. या मुलांना शाळेपर्यंत आणण्याचा महिला बालविकास विभागाचा हा प्रवास थक्क करणारा आहे. या मुलांना शिक्षणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोचविणे आवश्यक आहे. आज या मुलांच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास पाहता, ते पुढील आयुष्यात राष्ट्राला दिशा देणारे व्यक्तिमत्व होतील.

सुर्यवंशी यांनी या उपक्रमासाठी आवश्यक ते विधी सहाय्य देण्यात येईल, असे सांगितले. स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सिंग व जाधव तसेच दीक्षित यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गायकवाड यांनी प्रास्ताविकात उपक्रमाची माहिती दिली. बाल संरक्षण अधिकारी रामकृष्ण रेड्डी यांनी सूत्रसंचालन केले.

# आषाढी एकादशीच्या निमित्ताने ठाणे जिल्हाकडून ६० बसेसचे नियोजन

**ठाणे:** आषाढी एकादशीला आपल्या लाडक्या विठु रायाच्या दर्शनाला वारकरी संप्रदाय अक्षरशः आतुर झालेला असतो. यासाठी विठुचा गजर हरी नामाचा करत लाखो भक्तगत पायी चालत पंढरपूरला जातात. ज्यांना पायी चालत जाणे शक्य होत नाही त्यांच्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची लालपरी सज्ज झाली आहे. यासाठी ठाणे जिल्ह्यातून जादा ६० बसेसचे नियोजन केले आहे. या बसेसचे ग्रूप आरक्षण आणि तिकीट आरक्षण सुरू झाले आहे. तर आतापर्यंत दोन ग्रुप बुकिंग झाले आहे. या दिवसात पंढरपूरला जाण्यासाठी बसेसची जशी मागणी होईल तशी व्यवस्था केली जाणार आहे. तर पंढरपूर यात्रेला जाणाऱ्या ज्येष्ठ नागरीकासाठी अमृत ज्येष्ठ नागरीक योजना व महिला सन्मान योजना या दोन सवलती जाहीर आहेत. त्याचा लाभ ज्येष्ठ नागरिक आणि महिलांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

येत्या २९ जून २०२३ रोजी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविका करीता राज्य परिवहन ठाणे विभागाकडून ठाणे बस स्थानक, भिवंडी, कल्याण, विठ्ठलवाडी, डोबिंवली, वाडा, शहापूर, मुरबाड, बोरीवला नॅन्सी कॉलनी येथून येत्या २५ जून २०२३ पासून जादा गाडया सोडण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच २९ जून ते ०४ जुलै २०२३ पासुन चंद्रभागा बसस्थानक, पंढरपुर येथुन परतीची वाहतुक करण्यात येणार आहे. ठाणे आगार १ येथून १०, ठाणे २ येथुन ८, कल्याण येथून ९ तर भिवंडी, मुरबाड, विठ्ठल वाडी येथून प्रत्येकी ७ तसेच शहापूर आणि वाडा या आगारातून प्रत्येकी ६ बसेसचे जादा नियोजन केले आहे. सोडण्यात येणाऱ्या सर्व जादा गाडयांचे आरक्षण एक महिना अगोदर या पध्दतीने उपलब्ध करू देण्यात आले आहे. परतीचे आणि ग्रुप पध्दतीचे आरक्षण करण्याची व्यवस्था प्रत्येक बसस्थानकावर करण्यात आलेली आहे. तर यावर्षी राज्य शासनाकडून प्रवाशांकरिता ७५ वर्षेवरील ज्येष्ठ नागरीकासाठी अमृत ज्येष्ठ नागरीक योजना व महिला सन्मान योजना या दोन सवलती जाहीर केल्यामुळे त्याचा लाभ आषाढी पंढरपूर यात्रेकरीता जाणाऱ्या प्रवाशांना होणार आहे. तरी त्या भाविकांनी आषाढी पंढरपूर यात्रेकरिता बसेसने प्रवास करून या सवलतींचा लाभ घ्यावा असे आवाहन ठाणे विभागाकडून करण्यात येत आहे.

# २०२४ ला शिवसेनेकडून रमाकांत मढवी

## कल्याण ग्रामीणचे आमदारकीचे दावेदार





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेला जमलेला प्रचंड जनसागर

**▶ सुहास खंडागळे/विशेष**

मागील आठवड्यात बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवा येथे प्रचंड जाहीर सभा घेत दिवा आणि आजूबाजूच्या परिसरातील विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिवा शहराला भरभरून निधीची घोषणा केली. दिव्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन, मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल, दिवा शहरासाठी क्लस्टर योजना, आगरी कोळी व वारकरी भवन, खिडकाळेश्वर मंदिराचा विकास, आगासन देसाई खाडी ब्रिजचे भूमिपूजन अशा अनेक विकास कामांना चालना दिली.

हे करत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी उपमहापौर आणि दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या कामाचे भरभरून कौतुक केले. एकंदरीत संपूर्ण कार्यक्रमात दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या कामाचे कौतुक करण्याकडे मुख्यमंत्री आणि खासदार श्रीकांत शिंदे यांचा असलेला कल पाहता शिवसेनेमार्फत कल्याण ग्रामीणची विधानसभेची उमेदवारी रमाकांत मढवी यांना जाहीर होण्याची शक्यता अधिक निर्माण झाली आहे.तशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. रमाकांत मढवी हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जवळचे मानले जातात. मागील तीन वर्षापासून रमाकांत मढवी यांनी दिवा शहरातील विकास कामांबबत खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून भरभरून विकास निधी आणला. त्याचबरोबर दिवा शहराबाहेरील भागात सुद्धा रमाकांत मढवी यांनी लक्ष घालत विकास कामांसाठी निधी आणण्यात पुढाकार घेतला. कल्याण ग्रामीण मतदारसंघ बांधण्याच्या दृष्टीने पक्ष नेतृत्वाकडून सुद्धा रमाकांत मढवी यांना ताकद दिली जात आहे. सध्याच्या घडीला रमाकांत मढवी यांच्या इतका तुल्यबल उमेदवार शिवसेनेकडून नाही. कल्याण ग्रामीणचा गड राखण्याची जबाबदारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रमाकांत मढवी यांच्या खांद्यावर टाकण्याची शक्यता अधिक आहे. तशा पद्धतीचे वातावरण शिवसेनेच्या माध्यमातून कल्याण ग्रामीण मध्ये निर्माण केलं जात आहे. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाचे लोकार्पणचे लागलेले बॅनर, यामध्ये रमाकांत मढवी यांचे बॅनर कल्याण ग्रामीण डोंबिवली परिसरात लक्ष वेधून घेत होते.एकप्रकारे मढवी यांची उमेदवारी घोषित करण्याचा हा संकेत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. विकास कामांसाठी भरभरून आणलेला निधी, मोठ्या प्रमाणात होत असलेली विकास कामे आणि डॉक्टर श्रीकांत शिंदे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा असलेला भक्कम पाठिंबा यामुळे आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत रमाकांत मढवी आमदार म्हणून विधानसभेत जातील अशी अपेक्षा मढवी यांचे कार्यकर्ते बोलून दाखवतात.